# एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP)

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) ही योजना केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय यांनी निर्गमित केलेल्या सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ अन्वये राज्यात २००९ पासून कार्यान्वित झाली आहे. ही योजना केंद्र ९०% आणि राज्य १०% अर्थसहाय्याची आहे. सदर योजना प्रधान सचिव (जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा मार्फत राबविली जात आहे. या योजनेत उपचारांद्वारे मृद व जलसंधारण करणे, पावसाचे पाणी अडविणे ,भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे व मत्ताहीन नागरिकांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करणे असे मुख्य उद्देश आहेत. प्रकल्पाबाबतची बॅच निहाय सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | बॅचनिहाय माहिती | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बॅच-१ (२००९-१०) | बॅच-२ (२०१०-११) | बॅच-३ (२०११-१२) | बॅच-४ (२०१२-१३) | बॅच-५ (२०१३-१४) | बॅच-६ (२०१४-१५) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | ८ |
| १ | जिल्हे | २९ | ३२ | २३ | २० | ३१ | ३३ | ३३ |
| २ | तालुके | ७२ | ११० | ६७ | ४५ | ६३ | ८० | २४७ |
| ३ | प्रकल्प | २३९ | ३५९ | २१५ | १२० | ११६ | १२२ | ११७१ |
| ४ | ग्रामपंचायत | १६०६ | २९७७ | १५१८ | ८६० | ७७५ | ७४२ | ८४७८ |
| ५ | गावे | २२७४ | ३९१३ | १९०१ | १२९५ | १०४० | ११२८ | ११५५१ |
| ६ | सुक्ष्म पाणलोट | २८५८ | ४६२१ | २७९४ | १६३० | १६३४ | १३९८ | १४९३५ |
| ७ | भौगोलिक क्षेत्र (लक्ष हे.) | १६.५२ | २३.७४ | १३.५१ | ७.९४ | ७.४९ | ७.७० | ७६.९० |
| ८ | उपचाराचे क्षेत्र (लक्ष हे.) | ९.८३ | १५.६१ | ९.३१ | ५.२७ | ५.१९ | ५.४१ | ५०.६२ |
| ९ | प्रकल्प किमंत (रू.कोटी) | १२४० | १९५७ | ११९५ | ६८३ | ६६५ | ६९६ | ६४३६ |
| १० | प्राप्त निधी (केंद्र व राज्य)(रू.कोटी) | ५०८ | ७४० | १७३ | ६४ | ० | ० | १४८५ |
| ११ | वितरित निधी (व्याज धरुन)(रू.कोटी) | ५८५ | ६५३ | २१३ | ५२ | २५ | ० | १५२८ |
| १२ | खर्च निधी (रू.कोटी) | ५४९ | ६३२ | २०० | २७ | २ | ० | १४१० |
| १३ | भौतिक साध्य (लक्ष हे.) | ५.६३ | ६.२५ | १.६९ | ०.०७ | ० | ० | १३.६४ |